**RNI No. MAHBIL/2009/37831**

**Reg. No. MH/MR/South-339/2014-16**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार—ब

**वर्ष ६, अंक ६५(३)]** **शनिवार, ऑगस्ट ३०, २०१४/भाद्र ८, शके १९३६** **[पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००**

**असाधारण क्रमांक १८४**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**

**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**

२५, मर्झबान पथ, बांधकाम भवन

फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक ३० ऑगस्ट २०१४

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१.**

क्रमांक स्थाअस-२००८/प्र.क्र.४६/आस्था-९.—महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) याच्या कलम २७४, चे पोट-कलम (२), खंड (एकोणचाळीस) याच्याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि याबाबतीत महाराष्ट्र शासनाला समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी, उक्त कलम २७४, पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेले पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) (तिसरी सुधारणा) नियम, २०१४ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ यांना जोडलेल्या परिशिष्ट सहा मध्ये स्तंभ (२) मधील जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) आणि स्तंभ (३) मधील स्थापत्य अभियांत्रिकी सहायक याच्याशी संबंधित, स्तंभ क्रमांक (४) च्या नोंदीमध्ये, (१) (अ) (दोन) नंतर पुढील उपखंड दाखल करण्यात येईल :—

"(तीन) ज्या व्यक्ती दि. २ फेब्रुवारी २००६ रोजी जिल्हा परिषद सेवेत आहेत व ज्यांनी शासनाच्या तंत्र शिक्षण विभागाच्या शासकीय तांत्रिक संस्थेकडून घेण्यात आलेली स्थापत्य अभियांत्रिकी सहायकाची एक वर्ष मुदतीची पाठ्यक्रम परीक्षा किंवा समकक्ष अर्हता अधिसूचना निर्गमित होण्याच्या दिनांकाला उत्तीर्ण केली आहे, त्यांचे जिल्हा परिषदेतील पद व आस्थापनेचे स्वरूप विचारात न घेता जर ते स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या पदावर काम करण्यास इच्छुक असतील अशा व्यक्ती."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. ए. कुलकर्णी,**

शासनाचे उप सचिव.

# RURAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT

25, Marzban Path, Bandhakam Bhavan, Fort, Mumbai 400 001,
dated the 30th August 2014

## *NOTIFICATION*

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITI ACT, 1961

No. STHAUS-2008/CR-46/ Estt-9.– In exercise of the powers conferred by the clause (*xxxix*) of sub-section (*2*) of section 274 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samiti Act, 1961 (Mah. V of 1962) and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Zilla Parishads District Services (Recruitment) Rules, 1967 the same having been previously published as required by sub-section (*3*) of the said section 274, namely :-

1. These rules may be called the Maharashtra Zilla Parishads District Services (Recruitment) (Third Amendment) Rules, 2014.

2. In Appendix VI appended to the Maharahtra Zilla Parishads Districts Sevices (Recruitment) Rules, 1967, against entry 4 relating to District Technical Services (Class-III) (Secondary Engineering), Grade-1 in cloumn (2), and Civil Engineering Assistant in column (3), in column (4), in rule (*1*), in sub-rule (a), after clause (*ii*), the following clause shall be added, namely :-

"(*iii*) persons who are in the sevice of *Zilla Parishads* in the state as on the 2nd February 2006 who have passed the Civil Engineering Assistants one year Course examination or acquired any equivalent qualification at the time of issuance of the notification conducted by the Government Technical Institute of the Technical Education Department of the Government, shall be absorbed as Civil Engineering Assistant, if they are willing to work as Civil Engineering Assistant irrespective of their cadre and post in the *Zilla Parishad*."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. E. KULKARNI,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.